दि. १५.०२.२०१७

# दयानंदच्या अभिजीत जाधव व राजन सरवदे यांच्या शिवगीताचे प्रकाशन

लातूर - दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थी अभिजीत जाधव व राजन सरवदे यांनी शिवबांची थोरवी सांगणारे एक शिवगीत तयार केले आहे. या शिवगीताचे प्रकाशन दयानंद कला महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्रा. बालाजी घुटे, डॉ. सुनीता सांगोले, प्रा. दिलीप नागरगोजे आदी मान्यवर उपस्थित होते.

या गीताचे लेखन राजन सरवदे याने केले आहे तर त्याला अभिजीत जाधव, मयुर साठे आणि स्वरूप देशपांडे यांनी संगीत दिले आहे. तसेच निलेश पाठक (ढोलकी-दिमडी), धम्मदीप कांबळे (बुलबुल-तबला), रुपेश सूर्यवंशी (ढोल), अमर जाधव (दिमडी), अभिजीत जाधव (संबळ व साईड रिदम) यांनी साथ केली आहे.

या गीताचे गायन अभिजीत जाधव व राजन सरवदे यांनी केले आहे. तर उमेश सातलगे, अविनाश यादव, यशवंत पाटील, दर्शन पोळ, प्रियंका जाधव, वैष्णवी बरकते, करिष्मा सय्याद, मयुर साठे, अमर जाधव, आशिष जाधव व बलराज काटे यांनी सहगायन केले आहे. याचे चित्रीकरण विकास सुरवसे, रूपेश सूर्यवंशी, विश्वजीत रांजणकर आणि अभिजीत जाधव यांनी केले आहे. तर यामध्ये अभिनय प्रा. संदीप जगदाळे, बलराज काटे आणि अशुतोष संकाये-पाटील यांनी केले आहे. या गीताचे संकलन यश मिडीया लातूर यांनी केले आहे. या गीताचे चित्रीकरण सिंहगड किल्ला, वडवळ बेट, पुणे परिसर तथा दयानंद कला महाविद्यालयाच्या परिसरात झाले आहे. या गीताचे ध्वनीमुद्रण प्रशांत कुलकर्णी, दर्शन पोळ आणि बलराज काटे यांनी नेहा स्टुडिओ दत्तवाडी, पुणे येथे केले आहे. ही चित्रफीत Shivgeet या नावाने youtube वर upload केली असून ही सर्वांनी पाहावी असे अवाहन अभिजीत जाधव व राजन सरवदे यांनी केले आहे.

---